# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.11.2024** **वार – रविवार**

---

**निवडणूक**

विधानसभा निवडणुकीत भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीच्या दणदणीत विजयानंतर राज्यात सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. नवीन मुख्यमंत्र्यांचं नाव निश्चित करण्यापूर्वी युतीमधले तिन्ही पक्ष आपापल्या विधीमंडळ पक्षांच्या स्वतंत्र बैठका घेत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत त्यांची पक्षाच्या गटनेतेपदी निवड झाली. या बैठकीला पक्षाचे नेते खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनिल तटकरे, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते.

शिवसेनेच्या आमदारांचीही आज बैठक झाली. या बैठकीत पक्षाच्या सर्व निर्णयांचे एकाधिकार एकनाथ शिंदे यांच्याकडे देण्याचा निर्णय झाला.

विधानसभा निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर 15 ऑक्टोबर रोजी जाहीर झालेली आचारसंहिता संपेल, अशी माहिती निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, या निवडणुकीत भाजपा आणि महायुतीला विक्रमी यश मिळालं, तर काँग्रेस आणि महाविकास आघाडीला कधी नव्हे इतक्या कमी जागा मिळाल्या.

पुणे शहर आणि जिल्ह्यातही महायुतीनं वर्चस्व मिळवलं आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातल्या 11 पैकी 10 मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. वडगांव शेरीची एक जागा महाविकास आघाडीला मिळाली आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही मतदारांनी महायुतीच्या बाजूने कौल असून 10 पैकी 8 जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून आले आहेत. एक जागा महाविकास आघाडीला मिळाली तर एक जागा अपक्ष उमेदवारानं जिंकली.

संपूर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलेली बारामतीची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी मोठ्या मताधिक्यानं जिंकली. पुणे शहरातल्या विविध मतदार संघांत मतदारांनी भाजपाच्या बाजूने कौल दिला आहे. कसबा पेठ मतदारसंघात हेमंत रासने, कोथरुडमध्ये चंद्रकांत पाटील, पर्वती मतदारसंघात माधुरी मिसाळ, शिवाजीनगर मतदारसंघात सिद्धार्थ शिरोळे, पुणे कॅन्टोन्मेंटमध्ये सुनील कांबळे आणि खडकवसला मतदार संघात भीमराव तपाकीर हे भाजपाचे उमेदवार निवडून आले आहेत. हडपसर मतदार संघातही महायुतीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे चेतन तुपे यांनी विजय मिळवला आहे.

वडगांव शेरी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बापूसाहेब पठारे यांना विजय मिळाला आहे. दरम्यान पुण्यातील वडगाव शेरी विधानसभा मतदार संघात ईव्हीएम यंत्रणेत गैरव्यवहार झाला असल्याचा आरोप वडगाव शेरी मतदार संघातील बहुजन समाज पक्षाचे उमेदवार डॉ. हुलगेश चलवादी यांनी केला आहे. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असून लवकरच जनहित याचिका न्यायालयात दाखल करणार असल्याची माहिती डॉ. चलवादींनी दिली आहे.

## चिकुनगुनिया

पुण्यात गेल्या महिन्यापासून डेंग्यू रुग्णांची संख्या कमी झाली आहे. यावर्षी सप्टेंबर महिन्यात डेंग्यूचे सर्वाधिक म्हणजे 168 रुग्ण आढळून आले. तर ऑक्टोबर महिन्यात 63 रुग्णांना डेंग्यूचं निदान झालं. आता ही संख्या आणखी कमी होत जाईल असं सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी म्हटलं आहे.

## संजीवन समाधी

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्याला आळंदीमध्ये सुरुवात झाली असून राज्यभरातून लाखो भाविक आळंदीत दाखल होत आहेत. आळंदी नगरपरिषद, देवस्थान, एमआयटी महाविद्यालय, वारकरी सेवा संघ आणि इंद्रायणी सेवा फौंडेशनच्या वतीने वारी काळात शहर आणि इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेचं काम हाती घेण्यात आलं आहे, अशी माहिती आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी दिली. समाधी सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी चाकण चौक ते प्रदक्षिणा मार्ग, शिवसृष्टी परिसर, माउली मंदिर परिसर, इंद्रायणी नदी घाट या भागात पडलेला कचरा गोळा करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. मुंबईतील स्वच्छतादूत आणि जिल्ह्यातील पाचशेहून अधिक नागरिक आणि विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. यावेळी इंद्रायणी नदी घाटावर जनजागृतीपर पथनाट्य देखील सादर करण्यात आलं.

## वाहतूक कोंडी

मुंबई बंगलोर महामार्गावर वारजे इथं आज एक टँकर उलटल्यामुळे गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सकाळी 10 वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. यात कोणीही जखमी झाल्याचं वृत्त नंही.

## हवामान

पुणे आणि परिसरात सकाळच्या वेळी गारठा वाढू लागला आहे. आज किमान तापमान 13 पूर्णांक 4 दशांश अंश सेलसीयस नोंदवलं गेलं. उद्याही आकाश मुख्यतः निरभ्र राहून सकाळी धुकं पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. उद्या कमाल तापमान 30 आणि किमान तापमान 14 अंश सेलसीयसच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**